
# जन वाचन आंदोलन




जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नव-वाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.




भारत ज्ञान विज्ञान समिती

किंमत रु. २-५०

# तेजली

लेखिका : जयश्री भालेराव
रुपांतर : सुहास कोल्हेकर



भारत ज्ञान विज्ञान समिती

पुस्तकाचे नाव : तेजली

लेखिका : जयश्री भालेराव
अनुवाद : सुहास कोल्हेकर

निर्मिती सहाय्य : अमित नारकर

चित्रकार : यश कळवणकर
युथ आर्टिस्ट ऑर्गनायझेशन

जवाआं/२३

प्रकाशन : फेब्रुवारी १९९७

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

मूल्य : २ रुपये ५० पैसे

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४११००४

अक्षर जुळणी व मांडणी : दिनानाथ मनोहर

# तेजली

''मी नाही घेऊन जाणार आज बकऱ्या चारायला'' सकाळी सकाळी आईवर रागवत तेजली म्हणाली, ''मीच काय जायचं रोज? नथ्थूला का नाही पाठवत?'' आपल्या धाकट्या भावाकडे बोट दाखवत तिनं विचारलं.

''अगं, अजून लहान आहे तो. त्याच्या ओरडण्यानं काय बकऱ्या ऐकणार आहेत होय? पुढल्या वर्षापासून येईल बघ तो तुझ्याबरोबर,'' तिची आई समजूत काढत म्हणाली. इतक्यात समोर टेकडीवरून 'बें... बें...' ओरडत बकऱ्या खाली आल्या. त्यांच्या मागे देवला धावत येत होता. ते बघून तेजली चुलीपाशी गेली. तिनं फडक्यात आपली भाकर बांधली. ''तेजली! ए तेजली! अजून झोपलीच की काय? चल..चल'' देवलाची हाक आली.

तितक्यात मुरला, मुंगळी, कुंदी, फुंदी, सुकली, सुमनी, मंडी आणि वेस्ती सर्वजणं आली. सर्व आपापल्या बकऱ्या घेऊन आली. त्यांच्याबरोबर तेजलीही तिच्या बकऱ्या घेऊन निघाली. डोंगर चढून सगळे आंबाबारीच्या जंगलात पोचले. बकऱ्या चरत चरत जिकडे तिकडे पांगल्या. हिरव्या रानात जणू ठिपके पसरले, काही काळे, काही पांढरे, काही करडे, तर काही भुरे.

मग मुलांनी विट्टीदांडू काढले. त्यांचा खेळ रंगला. तेजली बाजूच्या मोठ्या खडकावर बसली होती. मधूनच ती मुलांचा खेळ बघत होती. पण तिची नजर सारखी भोवताली फिरत होती. 'जंगल किती सुंदर दिसतंय' तिच्या मनात आलं. पळसाची लाल लाल उमललेली फुलं. मधे मधे चमकणारी कुंदा, चमेलीची पांढरी फुलं. पक्षी कुठूनसे कुर्र कुर्र करताहेत, तर कुठून टर्र.. टर्र आवाज येतो आहे. बेडूक जणू त्यांची नक्कल करताहेत!'



एवढ्यात लांबून वेगळाच आवाज ऐकू आला. 'भर्रर...!' तेजलीने कान टवकारले. तो आवाज आता आणखी जवळून येऊ लागला.ती ओरडली, ''ए.. ऐका गं.. मोटरीचा आवाज येतोय.ऐका..'' देवला, कुंदी, फुंदी सगळे एकदम सावध झाले. आवाज जवळ, आणखी जवळ येऊ लागला. वळणावर एक जीप दिसू लागली. पुढे येऊन ती थोडी लांब अंतरावर थांबली. सर्व मुलंमुली पटकन् मोठ्या खडकामागं लपली. जीपमधून



४-५ जण उतरले. त्या लोकांकडे बघत तेजली नाराजीने म्हणाली, ''कोण जाणे, कोण लोक आहेत.''

''गप्प राहून बघ ना! बडबडू नको,'' देवलाने तिला हळूच हटकले.

ते लोक आसपास फिरू लागले, '' काय छान झाडं आहेत नाही?'' त्यातला एकजण बोलला. ''पूर्ण जंगल सागवानानं भरलयं,'' दुसरा म्हणाला. ''तो समोर आहे ना, तो कदंब आहे साहेब'' मालकासारख्या दिसणाऱ्या माणासाला ड्रायव्हर म्हणाला, ''बघा साहेब, कसला मोठा बुंधा आहे.'' मग ती माणसं झाडांच्या बुंध्यांवर ठक ठक करत फिरू लागली. पहाणी करू लागली.

''बघा, त्यांनी कसे काळे काळे उंच मोठाले बूट घातलेत. चालताना बुटांखाली लाल पळसाची छान फुलं चिरडून जातायंत, तिकडं लक्षसुद्धा नाही त्यांचं.'' देवला रागानं कुजबुजला.

पलिकडच्या दगडाआडचा मुरलाही डोळे मोठे करून फुंदीला काहीतरी समजावून सांगत होता. हे लोक अचानक आलेत तरी कुठून हे कुणालाच कळत नव्हतं.

तेजली देवलाला म्हणाली, ''हे लोक इथं आधीतर कधी दिसले नाहीत. त्यांना कुणी दाखवली असेल इथली वाट? चल देवला, आपणच विचारूयात त्यांना इकडं कुठून आलात म्हणून.''

''हो, हो, चल विचारू. काय गडबड आहे कळत नाही. काही घोटाळा तर नाही ना असा संशय येतोय मला.'' देवला म्हणाला.

'' पण त्यांनी आपल्याला उत्तरच दिलं नाही तर?'' तेजलीला शंका आली.

''बघूयात तर विचारून'' देवला म्हणाला. मग तेजलीने परवलीचा शब्द उच्चारला आणि त्या मोठ्या दगडामागे दडलेले सगळे सवंगडी बाहेर आले. फक्त कुंदी आणि फुंदी मात्र घाबरून लपूनच बसल्या.

ती बालसेना मग त्या काळ्या चष्मेवाल्या लठ्ठ माणसाजवळ पोचली. तेजलीने धीर एकवटून प्रश्न विचारला, ''तुम्ही काय करायला आलात इथं?''

तिला उत्तर न देता त्या माणसाने उलट प्रश्न विचारला, ''तुम्ही सारी पोरं इथं कशाला जमलात?''

''बकऱ्या चारायला!'' मुरला आपली चड्डी सावरत उत्तरला. त्याची तारांबळ पाहून वेस्तीला हसू आलं. तोंडावर हात झाकून तिनं ते दाबलं. त्या चष्मेवाल्याचं भलंथोरलं पोटही मजेशीरच होतं.

''मी ठेकेदार आहे! आता हे जंगल माझं आहे! उद्यापासून



अजिबात यायचं नाही इथं. काय समजलं? '' नाकावरचा चष्मा ठीक करत तो गुरकावला.



''तुमचं? ते कसं काय? तुम्हाला तर आधी कधीच इथं बघितलं नाही आम्ही.'' मंडी आश्चर्यानं म्हणाली.

''आम्ही ठेका घेतला आहे, जंगल तोडण्याचा.रोज इथली झाडं कापणार आहोत. आता इकडं आलात तर मराल फुकट.. कोसळणाऱ्या एखाद्या झाडाखाली दबून! अजिबात फिरकायचं नाही इकडं, समजलं का? '' दरडावून तो म्हणाला.

'' पण ही झाडं कापून काय करणार?'' तेजलीने विचारलं.

''लाकूड विकणार, मोठ्या शहरात, दिल्ली, मुंबई, भोपाळ'' ठेकेदार म्हणाला.

"मग त्या लाकडाचं काय होणार?" तेजलीनं त्याचा पिच्छा सोडला नाही. "टेबल,खुर्ची, कपाटं, पलंग, खिडक्या, दरवाजे अशा वस्तू बनवून विकणार" असं म्हणत ती माणसं माघारी फिरली.

त्यांची पाठ वळताच, मुरला आपल्या जोडीदारांना म्हणाला, "हे ठेकेदार म्हणे, म्हणजे ही चार माणसं आपलं जंगल कापणार? पण त्यांच्याकडे कुऱ्हाडसुद्धा नव्हती."

घुर्र..घुर्र.. आवाज करत जीप दूर निघून गेली. "आले असतील आज नुसतंच बघायला." तेजली म्हणाली.

बकऱ्या घेऊन घरी परतताना आज सर्व पोरं गप्पगप्प होती. सर्वांच्या मनात एकच विषय घोळत होता - ठेकेदाराचा.

"काय गं फुंदी, तू तर दडूनच बसलीस एवढा वेळ" देवलानं चिडवलं.

"आई गं! मला तर बाई त्या काळ्या चष्मेवाल्याची भीतीच वाटली," फुंदी म्हणाली.

"आता काय? आपण उद्यापासून जायचंच नाही का आंबाबारीच्या जंगलात?" तेजलीनं आपल्या सवंगड्याना विचारलं. सारे गप्पच राहिले.



देवला मात्र स्वत:शीच पुटपुटत पायाने दगड उडवत चालला होता. तो स्वत:च्याच तंद्रीत होता, "म्हणे सारं जंगल कापणार,आणि आम्ही गप्प बसायचं?"

आता आपण खेळायचं कुठं? बकऱ्या चारायला कुठं न्यायच्या? पेरू, बोरी, सिताफळं, कुठली खायची? आपण काटक्या कुठून गोळा करायच्या? काटक्या नसल्या तर भाकरी करायला चूल कशी पेटणार? शेकोटी नाही तर थंडीत झोप कशी लागणार? इतके सारे प्रश्न त्या सर्वांनाच भेडसावू लागले.



अंधार पडेपर्यंत सारे आपापल्या घरी पोचले. पण कुणाचंच जेवणात सुद्धा धड लक्ष लागेना. कसंबसं पोरं जेवली. मग एकमेकाला हाका देत सगळी यमुनाक्काच्या ओसरीत जमली. यमुनाक्का म्हणजे साऱ्या पाड्याचीच आजी. सर्वच आपल्या चिंता घेऊन तिच्याकडं येत. मनं मोकळी करत. यमुनाक्काने विचारलं, "काय रे, आज सगळी एवढ्या घाईनं शेकोटी भोवती?

गोष्ट हवी आहे वाटतं?'' क्षणभर कोणीच बोललं नाही. सारी गप्प होती.

मग तेजली म्हणाली, ''यमुनाक्का, आज जंगलात जीप घेऊन बाजारवाले लोक आले होते! सूटबूटवाले साहेब होते, म्हणत होते सर्व जंगल कापून नेणार.'' यमुनाक्का शेकोटीतील लाकडं हलवत होती. पण हे ऐकताच तिनं चमकून वर बघितलं, ''जंगल कापणार म्हणतो?'' तिनं विचारलं.

''हो - हो! असंच म्हणाले'' मनगटाला नाक पुसत फुंदी-कुंदीपण पुढे सरकत म्हणाल्या.

''म्हणजे ती ठेकेदार माणसं असतील. चार वर्षापूर्वी मछुआबारीचं जंगल असंच कापून नेलं त्यांनी. आता गावातल्या लोकांना लाकूड फाटा आणायला किती लांब लांब फिरावं लागतं,'' यमुनाक्का म्हणाली.

''आता तर ते आपलं आंबाबारीचं जंगलपण कापणार म्हणाले,'' देवलाची कानशीलं रागानं तापली होती. त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याला शांत करत यमुनाक्का म्हणाली, ''असं कसं नेणार? ह्या झाडाझुडपांना काय त्यांनी जगवलंय काय?''

''ह्या झाडांना ऊन पाणी काय तो ठेकेदार देतोय कां? म्हणे जंगल आता त्याचं'' तेजलीने आपला डावा पाय आपटला.



''मग कोणी लावलंय जंगल?'' धाकट्या वेस्तीनं विचारलं.

यमुनाक्का सांगू लागली, ''अरे पोरांनो जंगल उगवलं ह्या चिमण्या पाखरांनी आणि वाऱ्या पावसानं. हजारो वर्षांपासून न जाणो कुठून कुठून फळं तोडून खावून येतात ही पाखरं - त्या बिया मातीत रूजतात, आणि उगवतात झाडंझुडप, त्यांच्या बुडाशी गवत वाढतं. झाडंझुडपं वाढतात आणि उभी होतात जंगलं.''

''पण ही जंगलं एवढी मोठ्ठी कशी झाली?'' देवलाने विचारलं

''पाऊस आला, झाडं मोठी झाली, फळं आली. पुन्हा त्यातलं बी पडलं,आणखीन नवीन झाडं उगवली! पुन्हा पाऊस आला! असं होता होता घनदाट जंगल तयार झालं,'' यमुनाक्कानं आणखी माहिती दिली.

''म्हणजे हे जंगल पाखरांचं,'' मंडी म्हणाली.

''नाही. जो राखतो त्याचं जंगल.''यमुनाक्का म्हणाली.

''म्हणजे आंबाबारीचं जंगल आमचंच ना?'' मुरलानं विचारलं.

''हो'' यमुनाक्का म्हणाली.

''मग सगळं जंगल कापून शहरांत नेलं, तर आम्हाला तेंदूची पानं कशी मिळणार?'' मंडीने डोकं खाजवत विचारले.

''हो ना, आवळा, हिरडा, बेहडा, आंबा, चिंच...आणि लाकूड? कुठून मिळणार हे सारं?'' वेस्तीनं चिंता व्यक्त केली.

''आणि साऱ्या पाखरांचं काय? ती कुठं जाणार? आम्ही कुठं जायचं? आम्हाला खेळायला सावली कोण देणार? आम्हाला चिंचा, आवळे, बोरं-उंबरं, आंबे कुठून मिळणार?'' मंगलीनं विचारलं. सारी क्षणभर गप्प झाली. मग तेजली विचार करत हळुहळू म्हणाली, ''यमुनाक्का, मागं मवद्याकडं जाणारा रस्ता बनवला, आठवतं ना तुला? तेव्हा किती झाडं कापली होती. आता त्या झाडं कापलेल्या जागेवरून पावसाबरोबर सारखी लाललाल माती वाहून जाते. मधून मधून मातीच्या दरडी पण ढासळतात, हो की नाही? आता हे सारं जंगल कापल्यावर तर डोंगराची सारीच माती वाहून जाईल ना, मोठ्ठ्या पावसानं, पाण्याबरोबर?'' तेजलीनं विचारलं.

''हो ना! झाडांची मुळं आणि त्याखालचं गवत केवढी तरी माती धरून ठेवतात. पाण्याला पण रोखून धरतात. जंगल कापलं तर डोंगरावरची सारी माती जाईल वाहून नदी-नाल्यात!'' यमुनाक्कानं दुजोरा दिला.

''झाडं नाही, गवत नाही, माती नाही अन् पाणी पण नाही. मग आपण कुठं जायचं?'' देवलानं विचारलं. साऱ्यांच्या मनात



तोच प्रश्न होता. डोळे मिटेपर्यंत ह्याच गप्पा चालू होत्या. केंव्हातरी सगळी पोरं यमुनाक्काच्या ओसरीवरच आडवी झाली.

दुसऱ्या दिवशी ती सगळी पोरं जंगलात पोचली तर काय? हातात कुऱ्हाडी घेतलेल्या माणसांचा एक घोळका तिथं उभा होता. त्या माणसांना ठेकेदार काही तरी समजावत होता. आणि रोज मंजुळ गाणी गाणारी पाखरं आज मात्र विचित्र कर्कश्श आवाजात कलकलाट करत होती. तेजलीच्या लक्षात आलं, पाखरांना देखील नव्या संकटाची चाहूल लागलीय.

''बघा, बघा आलेत ते जंगल तोडणारे. पहा बिचारी पाखरं कशी घाबरून बाहेर आलीत सगळी आपापल्या घरट्यांतून'' तेजली बोलली.

'' काय करावं ते न उमजल्यानं पोरं तिथंच थांबली. एकेका झाडाला चार चार माणसांनी घेरलं होतं. झाडाझाडांवर कुऱ्हाडीचे सपासप घाव बसू लागले होते. त्या घावांच्या आवाजांनी आणि पक्ष्यांच्या कलकलाटानं जंगल भरून गेलं. झाडांच्या कत्तलीचा तो आवाज आणि ते दृश्य भीतिदायक वाटत होतं. कुंदीफुंदीच्या अंगावर सर्रकन काटा उभा राहिला.

सारी पोरं थबकून तिथंच थांबली होती. बराच वेळ गेला. आणि अचानक तेजली सुसाट धावत सुटली त्या जंगल तोडणाऱ्यांच्या दिशेनं. तेवढ्यात कडाड् आवाज होऊन एक कदंबाचा वृक्ष कोसळला. ''बापरे..चार चार लोक मिळून एकेक झाड तोडताहेत,''

देवला ओरडला.

कोसळणारा कदंब पाहून संतापानं आणि दुःखानं रडत-ओरडत तेजली त्या ठेकेदाराकडे धावली. ''थांबा, थांबा.. तोडू नका..'' ती जीवाच्या आकांतानं ओरडली.

''गप्प बसा रे पोरांनो'' ठेकेदार खेकसला, ''काही अक्कल आहे की नाही? पळा इथून. मराल फुकट चिरडून झाडाखाली,'' ठेकेदारानं दटावलं.



''आम्ही नाही जाणार. ऐका तरी आमचं ठेकेदारसाहेब'' तेजली म्हणाली, ''ही सारी पाखरं कुठं जाणार?'' आम्ही कुठं जाणार? आम्हाला खेळायला सावली कशी मिळणार? खायला फळं कशी मिळणार? ही सगळी माती, पाणी वाहून जाईल ना?'' पोरं एका सूरात ओरडली. पण तेजली, देवला, मुरला साऱ्यांच्या या प्रश्नांकडं ठेकेदारानं साफ दुर्लक्ष केलं. क्षणभरानं तो चालत पुढं गेला. एका माणसांशी काहीतरी बोलला. तो



माणूस हातात झाडाची एक जाडजूड फांदी घेऊन ओरडत पोरांवर धावून आला. पोरं घाबरून माघारी पळाली. निराश होऊन परत येताना देवला म्हणाला, ''बघ तेजली, ते तुटून पडलेलं झाड. बघ कसं मुडद्यासारखं दिसतयं नाही?''

'' शाळेत मास्तरांनी लढाईची गोष्ट सांगितली होती. त्यातल्या 'शहीद' झालेल्या शिपायासारखंच वाटतयं मला ते,'' तेजलीनं बाहीला डोळे पुसत आवंढा गिळला.

''काहीतरी करायलाच हवं. यमुनाक्का म्हणते ना आपलं जंगल, मग आपण वाचवायलाच हवं आपलं जंगल.'' वेस्ती म्हणाली.

''पण कसं वाचवायचं?'' हा एकच प्रश्न साऱ्यांच्या डोक्यात खळबळत होता.

संध्याकाळ झाली. भाकरी पोटात ढकलून पोरं लगबगीनं यमुनाक्काच्या ओसरीवर आली. शेकोटीभोवती गोळा झाली. पुन्हा गप्पा सुरू झाल्या. पोरांनी जंगलतोड कशी चालू आहे ते यमुनाक्काला सांगितलं.

''ठेकेदाराला पळवून लावायला हवं. सुचतेय का काही युक्ती?'' यमुनाक्कानं विचारलं.

''आम्ही सगळे उद्या गोफण घेऊन जातो आपापली आणि

लावतो पळवून एकेकाला,'' पोरं एका सूरात ओरडली.

''आमचं जंगल कापणार म्हणे सगळं,'' तेजली तणतणली. ''आपण अगदी थोडेच आहोत ना! पण मी असं करतो उद्या पहाटे मोरबियात जाऊन तिथल्या पोरांनाही आणतो,'' देवला म्हणाला.

''मी पण सिंदीया आणि महुआबारी दोन्हीकडे जाते लवकर,'' तेजली उत्साहानं म्हणाली.

'' मी कडाईपानी आणि केल्दीला जाऊन सांगतो,'' मुरलाने देवलाला टाळी दिली.

''फक्त पोरानांच काय, सगळ्या मोठ्या माणसांनाही सांगा. बोलवा त्यांना तुमच्या मदतीला,'' यमुनाक्कानं सुचवलं.

उजाडताच सगळीकडं निरोप गेले. डोंगरांवरच्या आणि दऱ्यातल्या सर्व वस्त्या हलल्या. झोपड्या झोपड्यांमधून पोरांचं सैन्य बाहेर पडले. थव्याथव्यानं ते आंबाबारीच्या जंगलाकडं निघाले.

मोठ्ठ्या चिंचेच्या खाली तेजली, देवला आणि बाकी पोरं आधीच पोचली होती. तेजलीनं खूष होत मुरलाचे लक्ष येणाऱ्या थव्याकडे वेधले, ''बघ.. जशा काय मोहळातून मधमाशाच निघाल्यात असं वाटतयं.'' पाड्यापाड्यातून एकेक टोळी पोचत



होती. ''प्रत्येकानं गोफण आणलीय ना बरोबर?'' तेजली सर्वांना आठवण करून देत होती.

चिंचेखाली सैन्य जमलं. पोरं, बकऱ्या,कुत्री.मग हळूहळू सगळी पलटण पुढे निघाली. दुरून ठेकेदाराचे लोक कुऱ्हाडी घेऊन पोहचलेले दिसताच, तेजलीने नारा दिला, ''जंगल हमारा है. भाग जाओ यहाँसे'' सर्व सैन्याने जोरदार घोषणा देऊन तिला साथ दिली.

''एवढी सारी पोरं'' ठेकेदाराच्या माणसांना हसूच आलं, हे असलं सैन्य बघून. एक माणूस म्हणाला, ''एवढीशी चिमुरडी काय करणार आहेत? पण आव बघा केवढा आणताहेत,''



पोरांकडं दुर्लक्ष करून त्यांनी झाडं कापायला सुरूवात केली.

''हमारे जंगलसे वापिस जाओ'' पुन्हा ओरडा झाला. तोवर गावातली मोठी बायामाणसं आणि पुरुषही पोहचले होते. त्यांच्या हातात तर मोठाले दंडे होते.

यमुनाक्का होती सर्वात पुढं, अन् तिच्या जोडीला होते पुजारीबाबा.

''आम्ही इथं पिढ्यान्‌पिढ्या रहातो आहोत. जंगल आमचं आहे. तुम्ही कोण? नाही कापायचं हे जंगल. आम्हीच राखलयं हे आजपर्यंत'' यमुनाक्काने ठेकेदारालाच दम भरला. ''तुम्हाला लाकडंच हवी तर लावा तुम्ही स्वत:ची झाडं आणि तोडा हवी तेवढी. आमच्या जंगलात पाऊल नाही ठेवायचं,'' पुजारीबाबाही पुढे झाले.

पण ठेकेदारानं त्याच्या माणसांना ''काम सुरूच ठेवा'' असं सांगितलं. ''काहीही पर्वा करू नका ह्यांची'' तो म्हणाला.

''आता गोफण सुरू करायला लागणार'' असं पुटपुटत तेजलीनं टाळी वाजवली आणि सर्व पोरांनी एकदम 'मारा' सुरू केला. पोरांनी आधीच दगडांचा भरपूर साठा तय्यार ठेवला होता.

'भूर्रर... फट्ट.. भूर्रर... फट्ट' असा आवाज करत वेगानं असंख्य दगड ठेकेदार व त्याच्या मजूरांच्या दिशेनं सतत भिरकावले जात होते. कुणाच्या डोक्याला, कुणाच्या पाठीत तर कुणाच्या



पायांवर रपकन् बसत होते. त्यांच्यात एकच गोंधळ माजला.

''पळा..पळा'' असं म्हणत ठेकेदार सर्वात पुढं पळू लागला. कसाबसा तो जीपमध्ये जाऊन बसला. ड्रायव्हरनं कशीतरी जीप काढली आणि जोरात पिटाळली. ठेकेदाराचे लोक जीपमागं धावू लागले. त्यांच्या मागे तेजली, देवला, मुरला आणि फुंदीसुद्धा धावत सुटली. ''त्यांना गावाबाहेर पिटाळू या, अगदी वेशीपर्यंत'' तेजली म्हणाली.

''हो आणि दगडांचा माराही चालूच ठेवू या,'' वेस्तीनं साथ दिली.

ठेकेदार व त्याच्या मजूरांना गावाबाहेर हाकलून लावल्यावर सारं 'सैन्य' पुन्हा आंबाबारीच्या जंगलात गोळा झाले. ''शाब्बास पोरांनो, जे आम्हाला जमलं नाही ते तुम्ही केलंत,'' पुजारीबाबांनी शाबासकी दिली. तोडलेली झाडं तिथंच टाकून ठेकेदार जीप घेऊन जे पळाला, ते पुन्हा येण्याचं धाडसही त्याला झालं नाही.

यमुनाक्काच्या ओसरीवर चणे फुटाणे खात पोरं 'विजयोत्सव' साजरा करत होती. नाचत गाणी गात होती. 'आमचं जंगल, आम्हीच राखू' मध्येच ओरडत होती.

जंगल तोडणाऱ्यांच्या विरूद्ध पहिली फेरी तरी त्यांनी जिंकली होती.

✦✦✦✦✦